समर्थ वाचनालय

वाचन आनंद

संकलन- अंजना लगस

साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

वाचन आनंद

संकलन- अंजना लगस

वाचन आनंद

संकलन- अंजना लगस

ग्रंथपाल
समर्थ विद्यामंदिर व समर्थ विद्यालय, उचगाव (पूर्व), कोल्हापूर
भ्रमण दरध्वनी 820 883 4250

इ मेल audio.esahitya@gmail.com

मुखपृष्ठ- शालेय विद्यार्थी- रितिका शर्मा इ सातवी
पंकजा भारत यमगर, इ सातवी

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : १५ जुलै २०२६ (महाकवि कालीदास दिन)

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. १००/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- अंजना लगस - 820 883 4250

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

ई साहित्य प्रतिष्ठानने हे पुस्तक का प्रकाशित केलं आहे?

खूप म्हणजे खूप जास्त प्रॉब्लेम्स आहेत. मराठी भाषा, मराठी साहित्य, यांच्यासमोर प्रचंड समस्या आहेत. लेखकांना प्रकाशक मिळत नाहीत. प्रकाशकांच्या पुस्तकांची विक्री होत नाही. आहेत ती पुस्तके कोणी विकत घेत नाहीत. वाचनालयं ओसाड पडत आहेत. जो तो मोबाईलच्या रील्स मधे अडकला आहे. लिहिणाऱ्याने कोणासाठी लिहावं? प्रकाशकांनी पुस्तकं छापावीत की नको असं झालंय. पूर्वी पाच दहा हजाराच्या अवृत्त्या निघत त्या आता दोनशे पाचशेवर आल्या आहेत. त्याही विकत कोण घेतं? तर वाचनालयं हा मुख्य ग्राहक. त्यांनाही शासकीय अनुदान मिळालं तरच परवडतं. कारण वाचकांच्या वर्गणीतून कार्यालय चालवणंही मुश्कील झालंय. तिकडे मराठी भाषेच्या नावाने झेंडे फडकावणारे नेतेही आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत घालत आहेत. कार्यकर्ते स्वतःही वाचतच नाहीत. कितीही म्हणा, मोठ्या माणसांना वाचनाची सवय आणि गोडी लावणं अशक्य आहे. ते काम शालेय वयातच करावं लागतं.

अशा अंधारमय परिस्थितीत एक दिवा दिसावा तसं अंजना लगस यांचं काम डोळ्यांसमोर आलं. अंजना गेली दहा वर्षं ई साहित्यचा ऑडिओ बुक्स चा विभाग सांभाळतात. शाळेच्या ग्रंथपाल म्हणून जे ग्रेट काम त्या करत आहेत त्याकडे लक्ष आताच गेलं. युरेक्का! अरे हेच तर उत्तर आहे! वरच्या सर्व समस्यांवर हेच उत्तर आहे. शॉर्टकट नाही. असंच दीर्घकालीन, कायमस्वरूपी काम होणं हीच काळाची गरज आहे. हे असं काम वेगवेगळ्या शाळांतून सुरू असणार. आता याचा शोध घेणं आणि त्याला प्रोत्साहन देत, सुसूत्र करणं यावर काही काम करता येईल का? ते अधिकाधिक पसरेल यासाठी काही करता येईल का? इतर शाळांना यात सहभागी करता येईल का?

यासाठी आम्हाला महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुक्यातून स्वयंसेवक आवश्यक आहेत. आपली इच्छा असेल तर आपणही सामिल होऊ शकता. कृपया ९९८७७३७२३७ या क्रमांकावर मेसेज करा.

चला मित्रांनो. एक अभियानच सुरू करुया. वाचन आनंद अभियान!

सुनीळ सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान

लेखिका अंजना लगस यांच्याबद्दल अधिक माहितीसाठी खालील कव्हरवर क्लिक करा.

पुस्तक वाचणारा विद्यार्थी ज्ञान मिळवतो; पण पुस्तकावर स्वतःचे विचार व्यक्त करणारा विद्यार्थी विचारवंत बनतो.

याच विश्वासातून जन्माला आलेल्या आमच्या "अभिप्राय" या वाचन उपक्रमाचा हा प्रवास आज पुस्तकाच्या रूपाने वाचकांसमोर येत आहे, ही माझ्यासाठी अत्यंत आनंदाची, अभिमानाची आणि समाधानाची बाब आहे.

हेल्पर्स ऑफ दि हॅण्डिकॅप्ड, कोल्हापूर द्वारा संचालित समर्थ विद्यामंदिर व समर्थ विद्यालय ही केवळ शाळा नसून संवेदनशील, प्रयोगशील आणि सर्वसमावेशक शिक्षणाची एक जिवंत प्रयोगशाळा आहे. येथे अपंग आणि सुदृढ विद्यार्थी एकत्र शिक्षण घेतात, एकमेकांकडून शिकतात आणि आयुष्याची खरी मूल्ये आत्मसात करतात. अशा या प्रेरणादायी वातावरणात गेली चौदा वर्षे ग्रंथपाल म्हणून कार्य करण्याचे भाग्य मला लाभले.

शाळेत रुजू झाल्यानंतर डॉ. नरेंद्र लांजेवार लिखित "एका ग्रंथपालाची प्रयोगशाळा" हे पुस्तक वाचण्याचा योग आला. त्या पुस्तकाने माझ्या विचारविश्वाला नवी दिशा दिली. ग्रंथालय हे केवळ पुस्तके देणे-घेणे यापुरते मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी माध्यम असू शकते, ही जाणीव त्या पुस्तकातून झाली. वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाला पुस्तक भेट दिल्यास त्यांना संपूर्ण शाळेसमोर आभारपत्र देण्याची प्रथा, शब्दखेळ, डोक्यालिटी यांसारखे विविध उपक्रम आणि आमच्या ग्रंथालयातील ओपन ॲक्सेस प्रणाली या सर्व उपक्रमांमागे त्या पुस्तकातून मिळालेली प्रेरणा आहे. आमच्या समर्थ वाचनालयात विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकांचे वाचक म्हणून नव्हे, तर ग्रंथालयाचे जबाबदार सहकारी म्हणून घडविण्याचा प्रयत्न केला जातो. वाचून झालेली पुस्तके विद्यार्थी स्वतः योग्य कपाटात जाऊन व्यवस्थित ठेवतात. एवढेच नव्हे, तर फावल्या वेळात अनेक विद्यार्थी स्वयंस्फूर्तीने ग्रंथालयात येऊन पुस्तके नीट लावणे, कपाटांची मांडणी करणे आणि ग्रंथालयाची व्यवस्था सांभाळणे अशी विविध कामे आनंदाने करतात. ग्रंथालयाचे हे काम त्यांच्यासाठी जबाबदारी नसून एक आवडीचा आणि अभिमानाचा उपक्रम बनला आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, स्वावलंबन, सामूहिक जबाबदारी आणि ग्रंथालयाविषयी आत्मीयता या मूल्यांचीही जोपासना होत आहे.

समर्थ वाचनालय अंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती अधिक दृढ व्हावी, ग्रंथालयांविषयी आत्मीयता निर्माण व्हावी आणि पुस्तकांच्या विस्तीर्ण विश्वाची ओळख व्हावी या उद्देशाने "ग्रंथालय एक सहल" हा उपक्रमही राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत वाचनप्रेमी विद्यार्थ्यांना कोल्हापूर येथील करवीर वाचन मंदिर येथे शैक्षणिक भेट देण्यात आली. या सहलीत विद्यार्थ्यांनी समृद्ध ग्रंथसंपदा, ग्रंथालयाचे व्यवस्थापन, संदर्भ विभाग आणि वाचनसंस्कृतीचा जवळून अनुभव घेतला. या अनुभवामुळे विद्यार्थ्यांच्या मनात ग्रंथालयाविषयी अधिक जिव्हाळा निर्माण झाला आणि वाचनाची प्रेरणा अधिक दृढ झाली.

सन २०१५ मध्ये संस्थेच्या वतीने दापोली तालुक्यातील चिखलगाव येथील 'लोकसाधना' शाळेला भेट देण्याची संधी मिळाली. डॉ. राजा दांडेकर आणि रेणू दांडेकर यांनी उभारलेले ते प्रयोगशील शैक्षणिक विश्व पाहताना अनेक नवीन कल्पना मनात रुजल्या. त्याच ठिकाणी "अभिप्राय" या उपक्रमाची ओळख झाली आणि मनात एक विचार दृढ झाला—"हा उपक्रम आपल्या विद्यार्थ्यांसाठीही नक्कीच घडला पाहिजे."

संस्थेचे तत्कालीन संघटक व शाळा संचालक श्री. प्रमोद (पी. डी.) देशपांडे सर, विश्वस्त सुचित्राताई मोर्डेकर, पर्यवेक्षिका रेखा देसाई आणि

मुख्याध्यापिका सौ. स्वाती उपाध्ये यांनी या कल्पनेला मनापासून पाठिंबा दिला. त्यांच्या प्रोत्साहनामुळे जून २०१५ पासून "अभिप्राय" उपक्रमाची औपचारिक सुरुवात झाली.

सुरुवातीला इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकाने स्वतंत्र अभिप्राय वही ठेवणे आणि ज्या भाषेतील पुस्तक वाचले, त्याच भाषेत स्वतःचे विचार लिहिणे हा नियम केला. तिसरी-चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी वाचन आणि पुस्तकाचे तोंडी सादरीकरण अशी पद्धत ठेवली. सुरुवातीचा काळ मात्र अत्यंत आव्हानात्मक होता. काही विद्यार्थ्यांनी अभिप्राय लिहिण्याच्या अटीमुळे ग्रंथालयात येणेच कमी केले. काहींनी माझ्याविषयी तक्रारीही केल्या. "अभिप्राय न लिहिताही आम्ही पुस्तक जमा करू," अशी त्यांची भूमिका होती. त्या वेळी हार मानणे सोपे होते; पण विद्यार्थ्यांच्या हितासाठी घेतलेल्या निर्णयावर माझा विश्वास अधिक दृढ होता.

मी प्रत्येक वर्गात जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. वाचनानंतर स्वतःचे विचार मांडण्याची सवय त्यांच्या लेखनशक्ती, विचारशक्ती, भाषिक कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी किती महत्त्वाची आहे, हे त्यांना संयमाने समजावून सांगितले. त्याचबरोबर अधिक वाचन व उत्कृष्ट अभिप्राय लेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून आकर्षक प्रमाणपत्रे आणि त्यांच्या वयोगटानुसार पुस्तके देण्याची योजना सुरू केली.

काही वर्षे प्रतिसाद अपेक्षेप्रमाणे नव्हता; पण सातत्य, संयम आणि विद्यार्थ्यांवरील विश्वास यामुळे परिस्थिती हळूहळू बदलू लागली

सुरुवातीच्या काळात उत्कृष्ट वाचन व अभिप्राय लेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनात केला जात असे. मात्र त्या वेळी पालक आणि उपस्थित प्रेक्षकांचा मुख्य भर विद्यार्थ्यांचे नृत्य, गायन आणि सांस्कृतिक कार्यक्रम पाहण्यावर असल्यामुळे वाचन चळवळीचा गौरव अपेक्षित परिणामकारकतेने त्यांच्यापर्यंत पोहोचत नव्हता. ही बाब संस्थेच्या विश्वस्त सुचित्राताई मोर्डेकर यांच्या लक्षात आली. त्यांनी अत्यंत समर्पक असा विचार मांडला की, वाचन, साहित्य आणि भाषेचा गौरव करणाऱ्या उपक्रमाचा सन्मान साहित्यिक वातावरणातच व्हायला हवा. त्यांच्या मार्गदर्शनानुसार सन 2017 पासून मराठी भाषा गौरव दिनानिमित्त अभिप्राय उपक्रमातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व पारितोषिक वितरण करण्यास सुरुवात झाली. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या यशाला अधिक प्रतिष्ठा लाभली, पालकांपर्यंत वाचन चळवळीचे महत्त्व प्रभावीपणे पोहोचले आणि या उपक्रमाला एक वेगळी साहित्यिक उंची प्राप्त झाली.

या उपक्रमाने अनेक संस्मरणीय क्षण दिले. एका दिव्यांग विद्यार्थ्याला हाताने लिहिणे कठीण होते; पण वाचनाची त्याला विलक्षण आवड होती. मित्रांच्या सहकार्याने त्याने अभिप्राय लिहिला. आजही त्या वहीतील विचार अनेक विद्यार्थ्यांना प्रेरणा देतात. त्या अभिप्रायामुळे इतर विद्यार्थ्यांना पुस्तकांविषयी उत्सुकता निर्माण होते आणि वाचनासाठी प्रेरणा मिळते. त्या क्षणी जाणवले की अभिप्राय म्हणजे केवळ पुस्तकाचा सारांश नसून एका मनाने दुसऱ्या मनाशी साधलेला जिवंत संवाद आहे.

सन २०२५ पासून तिसरीच्या विद्यार्थ्यांनाही अभिप्राय लेखनाची सवय लावण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीला थोडी भीती वाटली; परंतु या छोट्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या निरागस भाषेत व्यक्त केलेले विचार मनाला स्पर्शून गेले. काही महिन्यांतच त्यांच्या लेखनात, विचारांत आणि अभिव्यक्तीत झालेला बदल आश्चर्यकारक होता.

आज अनेक माजी विद्यार्थी आवर्जून सांगतात की या उपक्रमामुळे त्यांच्या लेखनशैलीत, व्याकरणात, विचारमांडणीत आणि स्पर्धा परीक्षांच्या तयारीत

मोठी मदत झाली. यापेक्षा मोठे समाधान एका ग्रंथपालाला आणखी काय असू शकते?

आज परिस्थिती अशी आहे की प्रत्येक वर्गात उत्कृष्ट वाचन आणि अभिप्राय लेखन करणारे अनेक विद्यार्थी तयार झाले आहेत. सुरुवातीला प्रत्येक वर्गातून पहिले तीन विद्यार्थ्यांना देण्यात येणारी पारितोषिके आता पाच-सहा विद्यार्थ्यांपर्यंत वाढली आहेत. ही वाढ केवळ संख्येची नाही; ती वाचनसंस्कृतीच्या बहराची आहे.

मागील दोन वर्षांपासून विद्यार्थ्यांचे निवडक अभिप्राय वर्गाच्या समूहात, सामाजिक माध्यमांवर आणि माझ्या स्टेटसद्वारे नियमितपणे प्रसिद्ध केले जातात. त्यामुळे पालक, शिक्षक आणि समाजालाही विद्यार्थ्यांच्या विचारविश्वाची ओळख होते. प्रत्येक अभिप्राय मी स्वतः काळजीपूर्वक वाचते, आवश्यक त्या सूचना देते आणि विद्यार्थ्यांच्या लेखनप्रवासात सहप्रवासी बनते.

या उपक्रमाचे कार्य पाहून ई-साहित्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. सुनीळ सामंत सर यांनी स्वतःहून या विषयावर पुस्तक प्रकाशित करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम आता पुस्तकाच्या रूपाने वाचकांपर्यंत पोहोचत आहे. त्याबद्दल मी त्यांची मनःपूर्वक ऋणी आहे.

सन २०२२ मध्ये या उपक्रमाचे कोल्हापूर जिल्ह्याचे तत्कालीन कार्यकारी अधिकारी श्री. संजयसिंह चव्हाण यांनी केलेले कौतुक ही माझ्यासाठी मोठी प्रेरणा ठरली.

या संपूर्ण प्रवासात संस्थेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक-मुख्याध्यापिका, सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि माझ्या प्रिय विद्यार्थ्यांचे सहकार्य मला सातत्याने लाभले. त्यांच्या विश्वासामुळेच हा उपक्रम आजही अखंडपणे सुरू आहे.

या पुस्तकातील प्रत्येक अभिप्राय हा केवळ विद्यार्थ्यांच्या वहीतील शब्द नाही; तर त्यांच्या विचारांचा, संवेदनांचा, कल्पनाशक्तीचा आणि वाचनप्रेमाचा उमललेला सुगंध आहे. हा सुगंध अधिकाधिक शाळांपर्यंत पोहोचावा, वाचनसंस्कृती अधिक समृद्ध व्हावी आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातात पुस्तकासोबत विचारांची लेखणीही यावी, हीच या पुस्तकामागील प्रामाणिक भावना.

धन्यवाद!

– अंजना लगस
ग्रंथपाल
हेल्पर्स ऑफ दि हॅण्डिकॅप्ड, कोल्हापूर, संचालित
समर्थ विद्यामंदिर व समर्थ विद्यालय,
उचगाव (पूर्व), ता. करवीर, जि. कोल्हापूर



समिता मांडरे
इयत्ता दहावी

अभिप्राय लेखन...

गड आला पण सिंह गेला !

लेखक - हरि नारायण आपटे

2026-27 च्या नवीन शैक्षणिक वर्षातील पुस्तक वाचनाची सुरुवात ऐतिहासिक पुस्तकाने करण्या असे ठरवले. व ह्या नवीन शैक्षणिक वर्षात मी पहिले पुस्तक "गड आला पण सिंह गेला" हे वाचले.

गड आला पण सिंह गेला हे मराठी साहित्यातील एक अत्यंत प्रेरणादायी व ऐतिहासिक पुस्तक आहे. या पुस्तकात सिंहगडाच्या लढाईतील शूरवीर तानाजी मालुसरे यांच्या अद्वितीय पराक्रमाचे वर्णन केले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यासाठी केलेल्या संघर्षात तानाजींनी दिलेले बलिदान अतिशय हृदयस्पर्शी आणि प्रेरणादायी आहे.

हे पुस्तक वाचताना आपण प्रत्यक्ष रणभूमीवर असल्याचा अनुभव येतो. तानाजींचे धैर्य, स्वामीनिष्ठा, कर्तव्यभावना आणि देशप्रेम यांचे प्रभावी चित्रण लेखकाने केले आहे. "आधी लगीन कोंडाण्याचं मग माझ्या रायबाचं" हा तानाजींचा विचार त्यांच्या स्वराज्यनिष्ठेची साक्ष देतो. सिंहगड जिंकण्यात यश आले, परंतु तानाजींसारखा पराक्रमी योद्ध्या गमावल्यामुळे "गड आला पण सिंह गेला" असे म्हटले जाते.

या पुस्तकातून शौर्य, त्याग, राष्ट्रप्रेम आणि कर्तव्य निष्ठा यांचे महत्त्व समजते. या पुस्तकातील भाषा सोपी, सरळ, ओघवती व प्रभावी असल्याने पुस्तक वाचायला उत्सुकता, आवड निर्माण होते.

धन्यवाद ...!

धन्य!

23/06/2026

घेतलेली दिनांक :- 17-06-26
जमा दिनांक :- 23-06-26


Coming Back
The Science of Reincarnation
A.C. Bhaktiveda
Coming back.
Received Date:- 17-06-26
Deposit Date:- 23-06-26
What I loved most about this book is that it does not just ask you to blindly believe in rebirth. Instead, it explains the concept of the soul using logic and simple science. It compares the change of our body to how energy changes forms, which made a lot of sense to me as a student. Usually talking about death feels scary or sad. But this book doesn't scare the reader. It treats death like a transition or a graduation to the next level, which actually bring a lot of peace and positivity.
For me, this book was a great eye-opener. It is short, easy to read and doesn't use overly complicated words, It helped me under stand that there is a purpose to our lives beyond just studying, earning money and growing old. I highly recommend this book to any student who is curious about the deeper mysteries of life.
Thank you!!
सृष्टी चौगले
इयत्ता दहावी


शिवरायांचे शिलेदार
मुरारबाजी देशपांडे
वरदा प्रकाशन
अमित भातलवंडे
इयत्ता दहावी
पुस्तकाचे नाव : मुरारबाजी देशपांडे
लेखक : प्रभाकर भावे.
माझी 10 वी असल्यामुळे सुरवातीला मी पुस्तके घेणार नव्हतो. पण मला अंजना मॅडमांनी नीट समजावून सांगितले आणि पुस्तके पुस्तकांचे महत्व पटवून दिले. त्यामुळे मी हे पुस्तक घेतले.
"मुरारबाजी देशपांडे" हे पुस्तक वाचले. हे पुस्तक मला खूप आवडले. या पुस्तकात मुरारबाजी देशपांडे यांच्या शौर्याची आणि स्वराज्याप्रती असलेल्या निष्ठेची माहिती दिली आहे. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांसाठी केलेल्या पराक्रमाचे वर्णन खूप छान केले आहे.
या पुस्तकातून मला देशप्रेम, स्वराज्यनिष्ठा शौर्य, कर्तव्यनिष्ठा आणि संकटांना सामोरे जाण्याची प्रेरणा प्रेरणा मिळाली. मुरारबाजी देशपांडे यांच्या सारख्या विरांच्या पराक्रमामुळे झाली. स्वराज्य टिकून राहिले याची जाणीव या पुस्तकामुळे झाली. इतिहासातील महान व्यक्तींचे कार्य समजून घेण्यासाठी हे पुस्तक खूप उपयुक्त आहे.
लेली दिनांक : 22-6-26
जमा दिनांक : 27-6-26.
OK!
27/06/202


द स्टोरी ऑफ
माय लाईफ
अनुवाद
मानसी काणे
हेलन केलर
स्वरा आकुर्डे
इयत्ता दहावी
द स्टोरी ऑफ माय लाईफ
- हेलन केलर
अनुवाद :- मानसी काणे
दोतलेली दिनांक :- 17-6-2026
जमा दिनांक :- 29-6-2026
'द स्टोरी ऑफ माय लाईफ' हे पुस्तक खूप छान आहे. मी कल्पना देखील केली नव्हती की हे पुस्तक एवढे मनोरंजक आणि आकर्षक आहे. एक छोटी मुलगी म्हणजे 'हेलन केलर', यांचा जन्म 27 जून 1880 रोजी अलाबामा राज्याच्या फक्त 19 महिन्यांची असताना मेंदूचा खूप ताप आला आणि त्यामुळे तिची दृष्टी आणि श्रवणशक्ती दोन्ही गेली. त्यांना दिसत नव्हत, ऐकू येत नव्हतं, त्या बोलू शकत नव्हत्या तरी सुद्धा त्यांनी शिक्षणाची आस सोडली नाही. हेलन केलर यांनी रेडक्लिफ कॉलेजमधून 1904 मध्ये B.A ची पदवी घेतली. त्या संपूर्ण असलेल्या पहिल्या पदवीधर होत्या. अंध आणि कर्णबधिर लोकांसाठी त्यांनी अमूल्य काम केले. 'अमेरिकन फाउंडेशन फॉर द ब्लाइंड'च्या त्या सहसंस्थापक होत्या. एका दिव्यांग व्यक्तीकडे इतक्या कला असू शकतात तर आपल्यासारख्या सुदृढ व्यक्तीकडे का नाही? स्टीफन हॉकिंग हे आपल्या सर्वांच्या परिचयाचे आहेत. त्यांना ALS म्हणजे 'Amyotrophic Lateral Sclerosis' या सारखा भयंकर आजार झाला होता तरी सुद्धा त्यांनी संपूर्ण विश्वाचा आणि अंतराळाचा अभ्यास केला. हे सांगण्याचा एकच उद्देश की कोणताही सदृढ शरीराचे अपंग असतो, पण मनाने नाही. त्या व्यक्तीने ठरवले तर तो व्यक्ती संपूर्ण जग जिंकू शकतो.
Very Nice
29/06/26



निरंजन कांबळे
इयत्ता दहावी

GoodLuck
PAGE NO.
DATE

पुस्तकाचे नाव - पंडिता रमाबाई
लेखकाचे नाव - देवदत्त नारायण टिळक
घेतलेली दिनांक - 15/8/2026
जमा दिनांक - 21/8/2026

हे पुस्तक महाराष्ट्रातील थोर समाजसुधारिका पंडिता रमाबाई यांच्या विषयी आहे. लेखक देवदत्त नारायण टिळक यांनी पंडिता रमाबाई यांच्याविषयी अत्यंत प्रभावीपणे व सोप्या भाषेत आपले मत मांडले आहे. लहानपणी रमाबाईचे आई-वडिल त्यांना संस्कृत शिकवत असत. त्याकाळात मुलींना शिक्षण घेणे चुकीचे मानले जात होते. तरीही त्यांनी मेहनत घेऊन संस्कृतमध्ये मोठे ज्ञान मिळवले. त्यांच्या विद्येमुळे त्यांना पंडिता ही पदवी देण्यात आली.



वृषाली करंबे
इयत्ता नववी

* अभिप्राय *

कथा गजराजांच्या

विषय : माणूस आणि प्राणी यांच्यातील आवनिक नाते

केंद्रबिंदू : गजराज हत्ती आणि कृष्णाकाका यांची मैत्री

ठळक प्रसंग : मुलांचे खेळ, गजराजचे प्रेम, काकाची माया

शेवट : वियोगाचे दुःख, नाट्याची ओढ

२ प्रस्तावना :

कथा गजराजाच्या ही पाठ्यपुस्तकातील एक अत्यंत हृदयस्पर्शी कथा आहे. लेखकाने माणूस आणि प्राणी यांच्यातील निरपेक्ष, निस्वार्थी प्रेमाचे अतिशय तरल चित्रण केले आहे. ही कथा वाचकाच्या मनाला थेट भिडते.

कथेत मिळणारा संदेश :

ही कथा 'प्राणी - माणूस नात्यातील निरपेक्ष प्रेम' हा महत्वाचा संदेश देते. आजच्या स्वार्थी युगात माणूस माणसातरही प्रेम करायला विसरला आहे. अशा वेळी एका मुक्या प्राण्याने शिकवलेला प्रेमाचा, आपलेपणाचा धडा खूप मोलाचा आहे. प्राण्यांवर दया करा, त्यांना समजून घ्या, कारण त्यांनाही मन असते.

'कथा गजराजाच्या' ही केवळ एक गोष्ट नाही तर एक भावनिक अनुभव आहे. गजराज गेल्यावर घर सुनेसुने वाटणे, त्याच्या आठवणीने मन त्याकुळ होणे हे वाचताना आपलेही डोळे पाणावतात.

ही कथा माणूसाची जिवंत ठेवण्याचे काम करते. शाळेत आसताना प्रत्येक विद्यार्थ्याने ही कथा वाचलीच पाहिजे, कारण ती संवेदनशीलता शिकवते.

तात्पर्य : मुक्या प्राण्यांवर प्रेम करा, त्यांच्याशी माणूसकीने वागा. कारण बरे नाते जाती धर्माचे, माणूस - प्राण्याचे नसते, तर ते फक्त 'मनाचे' असते.

घेतलेली दिनांक - 17/6/20826
जमा दिनांक - 2/7/20826





GoodLuck
PAGE NO.:
DATE: / /

कवयित्री :- मनिषा पिंटू वराळे.
पुस्तकांचे नाव :- परिमळ
पुस्तक घेतलेली दिनांक :- 17-6-2026

मला हे पुस्तक आवडले. यातील भावना अतिशय हृदयास्पर्शी आहेत. वाचकांच्या मनाचा ठाव घेणाऱ्या या संवेदनशील कवितासंग्रहातून ~~अस्त~~ अस्तित्व, ~~संक~~ संस्कार, आई-बापाची व्यथा लाडक्या लेकीसाठी, कन्यारत्न नारीचे जगने. आजची स्त्री घायाळ या सारख्या कवितांतून समाज मन जागृत करण्याचा प्रयत्न केलेले आहे. या काव्यसंग्रहाची भाषा अतिशय साधी, सोपी व सहज वाचकांसाठी कविता वाचनीय आहेत.

आहेत.

* धन्यवाद..! *

ok!
Ajay
23/07/26

जमा ~~वर्ष~~ दिनांक :- 3-7-2026


प्रीती वडनेरकर
देशोदेशीच्या लोककथा
धनश्री पोवार
इयत्ता नववी
monday
PAGE NO. 15
DATE
पुस्तकाचे नाव :- देशोदेशीच्या लोककथा
लेखकाचे नाव :- प्रीती वडनेरकर
घेतलेली दिनांक :- 24-6-26
जमा दिनांक :- 3-7-26
मला पुस्तक आवडले. खूप छान आहे. मला माहित नव्हते की गणपतीची अनेक नावे आहेत जसे की, गणेश, मयुरेश, विनायक, गजानन, चिंतामणी आणि अजुन कितीतरी नावे आहेत. वेगवेगळ्या देशांतील लोककथा मराठीत आणल्यामुळे वाचणाऱ्यांना चांगले वाटेल. जगातील इतर संस्कृती तिथल्या मुल्यांची आणि विचार सरणीची ओळख सोप्या भाषेत होती चित्रात दाखवलेली समुद्राच्या काठावर बसलेली स्त्री आणि आकाशातील सुर्य या आकृतीमुळे शांत वातावरण तयार होते. मला आवडलेला प्रसंग म्हणजे जेव्हा संपूर्ण गावावर किंवा देशावर मोठे संकट येते आणि निसर्गाचे संतुलन बिघडते, तेव्हा एक सामान्य मुलगी किंवा राजकुमारी कोणत्याही शास्त्राशिवाय केवळ आपल्या बुद्धीचा आणि धैर्याच्या जोरावर समुद्राच्या टोकावर जाते. तिथे ती आकाशातील त्या रहस्यमयी आणि उग्र दिसणाऱ्या सुर्यदेवशी संवाद साधते.
धन्यवाद!
OK!
06/07/26



पुस्तकाचे नाव - प्रयोग करुया शास्त्रज्ञ होऊया!
लेखक = विनोदकुमार सोनावणे

मला हे पुस्तक खूप आवडले. या पुस्तकात खूप चांगले चांगले प्रयोग दाखवले आहेत. प्रयोग म्हणजे विद्युत निर्मिती कशी करायची. सगळे प्रयोग मला आवडले. विद्युत आणि चुंबकीय विज्ञान हे या पुस्तकाचे महत्त्व आहे. या नंतर वीज निर्मिती कशी करायचीत. प्रयोगासाठी उपयुक्त साहित्य सगळ्या प्रयोगा साठी सांगितले. सातत्याने केलेल्या चुंबकाच्या हालचालीमुळे विद्युत प्रवाह संवेदक ची आपली दिशा कधी उजव्या तर कधी डाव्या बाजुला बदलतो. प्रवाहाची दिशा सतत बदलत असते त्यामुळे या प्रकारच्या विद्युत धारेला 'प्रत्यावर्ती विद्युत धारा' असे म्हणतात. इंग्रजी मध्ये Alternating Current (AC) असे म्हणतात.

धन्यवाद

दिनांक - 15/06/26
जमा दिनांक - 17/06/26

OK!
17/06/2026

पुस्तकाचे नाव :- रणरागिनी झाशीची राणी लक्ष्मीबाई
लेखिका :- प्रा. अंजली बर्वे

मला हे पुस्तक खुप आवडले. कारण, या पुस्तकात रणरागिनी झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या जन्मापासुन ते मरण्यापर्यंतच्या सर्व गोष्टी होत्या. राणी लक्ष्मीबाई यांच्या जीवनात खुप वाईट प्रसंग आलेत, पण त्यांनी त्यातून कशी वाट काढली हे यातून मला कळाले. 'मेरी झाशी नहीं दुंगी' असे म्हणणारी माझी झाशीची राणी लक्ष्मीबाई या 'झाशीसाठी' इंग्रजांशी शेवटपर्यंत लढल्या. धन्य धन्य त्या झाशीच्या राणी.

धन्यवाद.

दिलेले दिनांक :- 17/06/2026
केलेला दिनांक :- 24/06/2026

ok
24/06/2026

आरोही निलेश पाटील
इयत्ता सातवी


शाहूरायांच्या
गोष्टी
श्री. श्याम कुरळे
पुस्तकाचे नाव = शाहूरायांच्या गोष्टी
लेखक = श्याम कुरळे
हे पुस्तक खुप छान आहे. या पुस्तकात भरपूर शाहू महाराजांच्या गोष्टी आहेत. त्यामधील मला आवडली ती गोष्ट, विलक्षण प्राणीप्रेम. आपण सगळे कुत्रे - मांजर पाळतो पण शाहू महाराज कुत्रे - माजरांसोबत हिंस्त्र जंगली चित्तेही पाळायचे. त्यांनी त्या चित्त्यांना खुप लळा लावला. ते त्यांच्या पाठीमागेच फिरायचे. यावरून समजते शाहू महाराजांचे प्राणीमात्रांवरचे प्रेम. याबरोबर मला एक घोषणा सुद्धा आवडली ती म्हणजे, शाहू छत्रपती राजाची गाड राजाची ताकद होती भीमाची!
घेतलेली दिनांक = 24/6/2026
जमा दिनांक = 6/7/2026
ok!
06/07/2026
श्रद्धा पाटील
इयत्ता सातवी



Book name- Cinderella
Recived Date- 15/6/26
Deposite Date- 24/6/26

From this story, I understood that goodness and kindness always win in the and. Cinderella was treated badly by her stepmother and stepsisters. But she never complained or became rude. she stayed kind should always be good to others, on matter how treat us.

Thank you!

24/06/2026

मानसी पाटील
इयत्ता सातवी


Book name:- A Bit too small
Written : Corinne Fenton
I liked this story book. This story is about a little hungry mouse searching everywhere for food. He looks in the kitchen, under the table, and around the house, but finds nothing. At last, he smells food and follows the smell with hope. This story taught us keep and trying but never give up.
received : 15/6/2026
Deposite : 25/6/2026
OK
Thank you!
25/06/2026
A Bit Too Small
आरोही दळवी
इयत्ता सातवी



प्रियदर्शनी बोडके
इयत्ता सातवी

सुख पहाट...

लेखक - प्रवीण दवणे.

घेतलेली दिनांक - 24/6/26
प्रत्या दिनांक - 26/6/26

मला हे पुस्तक खुप आवडले. मला यातून हे समजले की, संवेदनाची ही श्रीमंती आपलं अवघं अस्तित्व अर्थपूर्ण करते आणि आयुष्यात सुखदुःखाची ऊनसावली तर येत राहणार पण त्यावर मात करून आपण पुढे गेलं पाहिजे. या पुस्तकात हे पण होतं~ ~~मला~~ ~~वाटले~~ मैत्रीशिवाय आयुष्य ~~म~~ म्हणजे आकाशाशिवायची पृथ्वी! ~~आय~~ आयुष्यात एक तरी मैत्रिण असावी जिच्यासोबत आपण आपलं सिक्रेट शेअर करतो, डबा खातो.

सर्व शब्दांची लड कलात्मक बोटांनी गुंफून त्याचं एक महावस्त्र करीत जाते ती ~~मैत्र~~ मैत्री. धागे तोडीत नव्हे, जुळवीत गुंफीत जाते ती मैत्री. प्रवीण दवणे यांनी अस्य खुप छान पुस्तक लिहिले आहे.

धन्यवाद!

OK!
27/06/2026



पुस्तकाचे नाव :- चाचा पंडित नेहरू
लेखकाचे नाव :- प्राचार्य डी.बी. पाटील
घेतले तारीख :- 24-6-26
देले तारीख :- 3-7-26

हे पुस्तक चाचा पंडित नेहरू यांच्या आयुष्यात काय काय घडले यावर आधारित आहे. या पुस्तकात नेहरू यांचे घराणे, नेहरू घराण्यात मोतीलाल नेहरू यांचा जन्म झाला होता. ते सर्व मुलांसारखे शाळेत गेले नाहीत त्यांची घरी इतकी श्रीमंती होती की ते आलिशान आनंदभुवन येथे शिकवण्यात येत. त्यांना कमला नेहरूंची साथ मिळाली होती. त्यांचा तुरुंगवास झाला होता.

OK



पुस्तकाचे नाव : शालेय विद्यार्थ्यांसाठी बोधकथा

मला हे पुस्तक खूप आवडले. मला या पुस्तकामधून समजले की कोणतेही काम हिम्मत व धाडसाने केले पाहिजे, आणि आपण जर सत्याच्या बाजूने राहिले तर सत्याचा विजय हा होतोच. कठीण समय येता... या गोष्टीमध्ये मला कळाले की सुखात आपल्यासोबत शंभर असतात. मात्र दुःखात आपल्यासोबत कोणीही नसते. दरवेळेला आपण दुसऱ्याच्या सुखामध्ये आपले सुख मानावे. आपण काही केले तर आपल्याला कष्टाचे फळ मिळते, फक्त काम मनापासून करावे. आळशी या गोष्टीमध्ये असे सांगितले आहे की, आळशी माणूस कधीही पुढे जात नाही. सगळ्या गोष्टींमध्ये शक्ती अपेक्षित नसते, कधीतरी युक्तीही वापरावी लागते.

धन्यवाद!

घेतलेली दिनांक : 22/06/2026
जमा दिनांक : 6/07/2026

ईश्वरी पाटील
इयत्ता सातवी

पुस्तकाचे नाव - गंमत शाळा.

लेखकाचे नाव - राजीव तांबे

दिनांक
घेतलेली नोंद - 23/6/26
जमा नोंद - 6/7/26

हे पुस्तक मला खूप आवडले. या पुस्तकात खूप सारे खेळ आहेत. त्यामधील एक खेळाचे नाव फुलम - फुलम हा खेळ मला खूप आवडला. हे पुस्तक वाचताना मला वाटत होतं मीच हे खेळ खेळत आहे. हे या पुस्तकात जे खेळ आहेत ते सर्व अभ्यासावर आधारित आहेत. मी हे पुस्तक वाचल्यावर मग मी यातील फुलम - फुलम हा खेळ मी व माझ्या मैत्रीणीने खेळला खरी मजा तेव्हा येते जेव्हा सगळे फुलांची नावे संपतात.

धन्यवाद

Good!

06/07/2026



शारवी वसावे
इयत्ता सातवी



पुस्तकाचे नाव :- महात्मा जोतीराव फुले
लेखक :- प्रा. महावीर मुळे

मला हे पुस्तक खूप आवडले. या पुस्तकांमध्ये महात्मा जोतीराव फुले यांचे बालपण कसे गेले यांची त्यांची माहिती दिली आहे. जोतीरावांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी सातारा जिल्ह्यात झाला. त्यांनी नेटिव्ह फिमेल स्कूल-पुणे आणि दि सोसायटी फॉर प्रमोटिंग दी एज्युकेशन ऑफ महार्स मॅंग्ज अँड एक्सेट्रा अशा दोन शिक्षण संस्थेच्या माध्यमातून त्यांनी पुणे परिसरात अनेक शाळा सुरू केल्या. महात्मा फुले यांचे निधन २८ नोव्हें नोव्हेंबर १८९० रोजी पुणे येथे झाले.

धन्यवाद!

घेतलेली दिनांक - 24/6/2026
जमा दिनांक - 6/6/2026

06/7/26



आर्या जाधव
इयत्ता सातवी


मनोविकास
युवा विज्ञान कुतूहल
आनंद घैसास
पुस्तकाचे नाव : युवा विज्ञान कुतूहल
आनंद घैसास
या पुस्तकातून मला पहिले वैज्ञानिक संशोधन कोणते हे समजले. पहिले मापन हे मानवाच्या अवयवांशी जोडलेली आहेत. मेंदीचे झाड हे उष्ण वातावरणात वाढणारे एक झुडूप आहे. टॅनिन हे एक विषारी द्रव्य आहे. आपल्या केस व नखांमध्ये 'केरेटीन' असते. पुस्तकामध्ये खूपच चांगली चित्रे होती. वाचलेल जर समजलं नसेल तरी चित्रांकडे पाहून समजत होते. या पुस्तकामधील कुतूहल व माहिती यांचा उपयोग नक्कीच मला पुढील प्रवासासाठी फायदेशीर ठरेल! धन्यवाद!
घेतलेली तारीख-29/6/2026
जमा दिनांक-6/7/2026
पंकजा यमगर
इयत्ता सातवी



श्रावणी पाटील
इयत्ता सातवी

पुस्तकाचे नाव - इंडिया डायरी
लेखक - प्रमोद (पी.डी) देशपांडे

या पुस्तकामध्ये महत्वाचे मुद्दा आहे. १९४७ साली कोणकोणत्या घडामोडी आहेत हे सांगितले आहे यामधील महत्वाचे गोष्टी ३० जानेवारी रोजी नवी दिल्लीत नथुराम विनायक गोडसे यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची हत्या केली त्याचा सिद्धांचा तात्या होता. भारताला स्वातंत्र्य मिळवले. भारतीय राज्यघटना मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारताच्या राज्यघटनेची प्रत राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्याकडे सुपुर्त करतात दिनांक 25 नोव्हेंबर १९४९ रोजी हरिसिंह आणि सरदार पटेल हे पहिले भारत आणि पाकिस्तान युद्ध लढले. पहिली प्रजा फार गरिब होती. या प्रजेला थोर व गरिब लोकांनी पुढे आणले या लोकांच्या सहकार्य वृत्तीला माझा कोटी कोटी प्रणाम

धन्यवाद!

देण्याची दिनांक - 27/6/26
जमा दिनांक - 6/7/26

AK
06/07/26



कहानीका नाम : चिंकू और मिंकू

लेखिका : सुस्मिता कुमार

यह ~~क~~कहानी मुझे बहुत ज्यादा अच्छी लगी यह चिंकू और मिंकू यह दो गिलहरी थी। सुस्मिता कुमार इनकी पहली कहानी है। इस कहानी में एक चीकू है उसका नाम था डिंपू। चिंकू और मिंकू को बेर खाना बहुत पसंत था। वह बेर बहुत मीठे और स्वादिष्ट थे।

प्राप्त तारीख = 26/6/2026

जमा तारीख = 1/7/2026

शुक्रिया.....!

ok!

01/07/202

शर्वरी माळी
इयत्ता सहावी


विश्व वैज्ञानिक
एडा लवलेस
WELCOME
MAPLE KI
किताब का नाम = एडा लवलेस
लेखिका = सुश्री-मता कुमार
पु नं = 13787
यह किताब बहुत अच्छी है। इस किताब में एडा लवलेस के बारेमें बहुत सारी जानकारी दी गई है। एडा लवलेस प्रतिभाशाली होने के कारण वह कई प्रसिद्ध गणितज्ञों और वैज्ञानिकों से मिली हैं। एडा लवलेस का प्रसिद्ध प्रोग्राम एनालिटिकल इंजन पर उनके सहयोग में सम्मिलित किया गया था। दुःख की बात है की बिमारी के कारण एडा शीघ्र ही चली गई बहुत काम आयु में ही उनका निधन हो गया। मैं यह किताब में बहुत सारा सिखने जैसा है। किताब कम्प्युटर एवं के बारेमें जानकारी दी गई है।
प्राप्त तारीख - 25/06/2026
जमा तारीख - 1/07/2026
OK!
स्वरा कांबळे
इयत्ता सहावी



शुक्रवार
PAGE NO.: 1
DATE: 2/7/26

महाराष्ट्राची शौर्यकथा

लेखक:- राजेंद्र चौधरी

हे पुस्तक मला खूप आवडले. या पुस्तकातील चित्रे सुद्धा खूप छान आहेत. यात यशवंतराव चव्हाण यांचे एक वाक्य मला खूप आवडले ते म्हणजे "संयुक्त महाराष्ट्रासाठी लढाई करण्याची वेळ आली तर लाल सलाम सोडून मैदानात उतरण्याची तयारी आहे." या वाक्यातूनच मला यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्र प्रेम दिसून येते. मला एका गोष्टीचे खूप वाईट वाटले. ती गोष्ट म्हणजे नरराक्षक मोरारजी देसाई यांनी पोलिसांना आदेश देऊन सत्याग्रहींवर गोळीबार करण्यास लावून हत्याकांड घडविले. मला या गोष्टीतून कळाले की आपल्याला कितीही मोठे पद मिळाले असले तर त्याचा वापर चांगल्या कामासाठी करावा.

घेतलेली दिनांक	जमा दिनांक
29/6/26	3/7/26

OK!
Ajay
03/07/2026

Good Luck
PAGE NO.
DATE: / /

पुस्तकाचे नाव :- पर्यावरण - प्रदूषण
लेखिका :- सुशीला संकपाळ
घेणे :- 26/6/26 देणे :- 4/7/26

नमस्कार ....!
मला हे पुस्तक खुप आवडले. मला ह्या पुस्तकातुन हे समजले की आपलण परिसर स्वच्छ ठेवला पाहिजे. मला पहिल्या गोष्टीतुन हे समजले की मानवनिर्मित पर्यावरणात माणुस हा प्रमुख घटक आहे. मला चौथी सुद्धा गोष्ट आवडली. मला यातुन हे समजले की हवेत अस्वच्छ वायू मिसळतात. आणि ते ओपल्या पर्यंत पोहचतात.

धन्यवाद ....!

OK!
Ajay
4/7/2026

महेश्वरी भोपळे
इयत्ता पाचवी


मूर्ख गाढव
बोध्प्रदगोष्टि
मुर्ख गाढव
मुर्ख गाढव ही गोष्ट खुप सुंदर आहे. कलाकारांने
रामाची मुर्ती खुप सुंदर केली होती कलाकार
ही मुर्ती विकण्यासाठी शहरात गेला होत. मुर्तीकाने
गाढवावर रामाच्या मुर्तीला ठेवले.
Very Good!
घेतलेली दिनांक - 1/7/2026
जमा दिनांक - 4/7/2026
अनुष्का रणदिवे
इयत्ता तिसरी

पुस्तकाचे नाव :- सुटका आणि रंगीत डोंगर.
हे पुस्तक छान आहे. मला माझे बालपण
आठवले. आईचे अंगाई एकवून मला
झोपवले, मी केलेला माझे लाड करणे
असून खूप काही करणे. मला आवडले.

घेतलेली दिनांक :- 20-६-२६
जमा दिनांक :- 06/07/2026

राही हिप्परगे
इयत्ता तिसरी




नागोबाचं वेटोळं
वर्षा गजेंद्रगडकर
वयोगट - ७ ते ९ वर्षे
अनुष्का संकपाळ
इयत्ता तिसरी


लिओ टॉलस्टॉय
लांडगा आला रे आला
आणि इतर गोष्टी
अर्णव विचारे
इयत्ता तिसरी
लिओ टॉलस्टॉय
लांडगा आला रे आला
आणि इतर गोष्टी
Date
Page No
लिओ टॉलस्टॉय
लांडगा आला रे आला
आणि इतर गोष्टी
मला हे पुस्तक आवडले. एका मुलग्याला
एक मांजराचे पिल्लू मिळाले. काल्या
आणि वास्या हे बहिणभाऊ होते.
वास्या शिडिवरुन वर गेली.
काल्या आणि वास्याचे एक मांजराचे
पिल्लू होते.
ok!
06/07/2026
घेतलेली दिनांक- 17/6/2026
जमकेल्याली दिनांक-6/7/2026

मूल्य शिक्षणासाठी
दररोज एक कथा

आधुनिक
नीतिकथा

ऑगस्ट - ३१ कथा

Diamond Publications

पुस्तकाचे नाव ऑगस्ट ३१ कथा
हे पुस्तक मला खूप आवडते
या पुस्तकामध्ये एक राजा होता आणि तो खूप
विलासी होता. सर्व वाईट कामे तो करीत असे.
तो आपल्या प्रधानमंत्र्यांना मरणाचा माणसाचा
जन्म वारंवार मिळत नसतो म्हणून खूप भोग
द्यावा. मौजमजा करावी. प्रधानमंत्री सज्जन
माणूस होता. राजाच्या कृत्यामुळे त्याला वाईट वाटत
असे.

घेतलेले दिनांक - 05/07/2026
जमा दिनांक - 06/07/2026

OK
06/07/2026

इशा सावंत
इयत्ता तिसरी


GoodLuck
PAGE NO:
DATE:
पुस्तकाचे नाव - नावात काय आहे?
हे पुस्तक मला खूप आवडले
तिचे शेवटी मीना नाव ठेवले.
तिला आधी सगळे खूप छोटू गोटू
या नावाने हाक मारले जाते होती.
या पुस्तकामुळे मला हे शिकायला
मिळाले. की तीची नावे जशी की
छक्कू गक्कू छोटू गोटू.
घेतलेली दिनांक - 1/7/2026
नाना विनायक - 06/07/2026
छान लिहिलेस!
06/07/2026
नावात काय आहे?
लेखन : मुक्ता चाम
चित्रे : शुभांगी चेतन
ऐश्वर्या ढोकळे
इयत्ता तिसरी



गोष्टीचे नाव – बिल्लोरी कवडसे

बिल्लोरी कवडसे या गोष्टीमध्ये सरांनी मुलांना बिल्लोरी म्हणजे काय हे समजवून सांगीतले. दिवाळी या गोष्टीत आईवडील समुला सकाळी लवकर उठण्यास सांगतात. पण समु उठत नाही. त्याला फटाके आणून न दिल्याने तो नाराज होता. या पुस्तकात का? आणि कशासाठी, आंबट आवळ्याची गोड गोष्ट, सुर्य देव आणि

माणुस या गोष्टी आहेत.
पुस्तकाची ३० पाने आहेत.
पुस्तकात सुंदर चित्रे आहेत.
या पुस्तकातील गोष्टी आवडल्या
नाव – रेवती परशराम माईनकर
इयत्ता – तिसरी

घेतलेली दिनांक – 17/6/2026
जमा दिनांक – 6/7/2026

ok!
06/07/2026

बब्बड

दांडोबा राक्षस आणि गुळगुळीत मावशी

राजीव तांबे

सिद्धी मोरे
इयत्ता तिसरी

दांडोबा राक्षस आणि गुळगुळीत मावशी
वाचली. गोष्ट खूप सुंदर आहे. पहिल्या
गोष्टीत बब्बड नावाच्या लहान मुलीला
दांडोबा नावाचा राक्षस घाबरतो आणि
दुसऱ्या गोष्टीत गुलगुळी मावशी
ने आणलेले दुपट बब्बडला आवडत
नाही.

छान लिहिलेस!

06/01/2026

घेतलेली दिनांक :- 17/6/26
जमा दिनांक :- 6/7/26

पुस्तकाचे नाव :- जिद्दीच्या पायावर
लेखिका :- जयश्री पटवर्धन
घेणे :- 25/6/26 जमा :- 2/6/26

नमस्कार.....!

मला हे पुस्तक खुप आवडले. मला अंजना लगस ह्या टिचर खुप आवडतात. मला हे पुस्तक वाचून रडू आले. मी तुमची कविता वाचली. हे पुस्तक माझ्या दिदीने वाचले. ह्या पुस्तकात मी तुमच्या लहानपणीचे फोटो पाहिले. परिस्थिती नसताना सुद्धा तुम्ही शिकत राहिला. म्हणून मला तुमचा अभिमान आहे. मला तुमची लहानपणापासून ते शिक्षणापर्यंतची गोष्ट वाचून तुमची परिस्थिती नसताना सुद्धा तुमची कष्ट व जिद्द पाहून मला तुमच्या कडून प्रेरणा मिळाली.

धन्यवाद.....!

हिलेख.

/07/2026

समृद्धी पोतदार
इयत्ता पाचवी



* माझे समर्थ वाचनालय *

ग्रंथालय म्हणजे पुस्तकांची दुनिया,
पुस्तकात असते गोष्टी व कवितांची किमया.

पुस्तक असते विविध भाषांचे, त्यातून मिळते ज्ञान
मुले म्हणतात पुस्तक आहे खुपच छान

दिव्यांग विद्यार्थी खेळत नाहीत पण वाचतात फार
म्हणूनच तेही असतात खुप हुशार

पुस्तक वाचणे हे फक्त ज्ञान नसते
तर विविध भाषांची ओळख असते

पुस्तकात असतात गमतीशीर गोष्टी
वाचताना आम्ही करतो चेष्टामस्ती

शिक्षकांनाही आवड आहे वाचनाची
म्हणूनच मुलांना गोडी लागते पुस्तक घेण्याची

शाळेत असतात विविध खेळ
पण ग्रंथालयात असतो पुस्तकांचा मेळ.

- श्रध्दा पाटील (7वी)
- प्रियदर्शनी बोडखे (7वी)

शाळेचे नाव = समर्थ विद्या मंदिर उंचगाव (पूर्व)

समर्थ
वाचनालय